REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER – 2017

# अध्ययन अकार्यक्षमता : प्रकार, समस्या व उपाय

प्रा. डॉ. सुनिल परशराम पाटील
सहयोगी प्राध्यापक, धु.ए.सो.चे. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, धुळे.

**सारांश :**

मानवाला अन्न, वस्त्र, निवार हया प्राथमिक गरजांप्रमाणे आज शिक्षण ही एक मुलभूत गरज झाली आहे. प्रत्येकाला त्याच्या क्षमतेनुसार विकास करण्याची शक्ती शिक्षणातून मिळायला हवी. परंतू शाळेत प्रवेश घेतलेल्या मुलांमध्ये काही मुलांना अध्ययनात अडचणी येतात. ते इतर सहकारी मुलांबरोबर सहभाग घेऊ शकत नाहीत. त्यांना टाळून चालणार नाही. कारण भारतीय घटनेनुसार व कायदेशीर तरतुदीनुसार शिक्षण हा प्रत्येकाचा मुलभूत हक्क आहे. तो कोणालाही डावलता येत नाही म्हणून जे शिक्षणात मागे पडतात अशा अध्ययन अकार्यक्षम मुलांना अधिक मार्गदर्शन देऊन शिक्षणाचा प्रवाहात त्यांचाही विकास होणे आवश्यक आहे. अध्ययन अकार्यक्षमता म्हणजे शिक्षण घेतांना येणारा अडथळा होय. ही मुले बुंध्दयंकाच्या दृष्टिने सर्वसामान्यांप्रमाणे असतात. तरीही ती मागे पडतात. मेंदुतील सर्वसाधरण कार्यातील सौम्यत्रुटी म्हणजे अध्ययन अकार्यक्षमता असते. अशा अध्ययन अकार्यक्षमतेचे वाचन विषयक, लेखनविषयक, गणितविषयक हे तीन मुख्य प्रकार असून ज्ञानेंद्रियांच्या एकात्मिकरणाचा विस्कळीतपणा, श्रवणविषयक क्रियांमधील विस्कळीतपणा, दृक क्रियांमधील विस्कळीतपणा हे उपप्रकार आहेत. हे उपप्रकार म्हणजे तीन मुख्य प्रकारांचा परिणाम आहेत. प्रस्तूत लेखात अध्ययन अकार्यक्षमतेचा मुख्य तीन प्रकार त्यातील समस्या व उपाय यांचा परामर्ष घेतला आहे.

**प्रास्ताविक :**

सृष्टीत जन्माला आलेल्या प्रत्येक जीवाला निसर्गाचे चैतन्याचे भरभरुन वरदान दिले आहे. पण असेही काही अपवादात्मक जीव आहेत. की, ज्यांना निसर्गाचा कोप सहन करावा लागत आहे. शाळेत प्रवेश घेतलेल्या काही मुलांना सहकार्यांबरोबर काही कार्यक्रमांमध्ये भाग घेता येत नाही. ते अध्ययनात मागे पडतात. अशा मागे पडणाज्या मुलांना आव्हान समजून त्यांच्या व्यवस्थित अध्ययनाची रचना करणे फार महत्वाचे आहे. या मुलांना “ओझेछ म्हणून टाळणे अयोग्य ठरेल कारण प्रत्येकाला शिक्षणाचा हक्क मान्य केला आहे. घटनात्मक तरतुदीनुसार मुलांना शिक्षणात दाखल केले म्हणजे शिक्षण होईलच असे नाही. मुळातच अध्ययन अकार्यक्षम मुलांचा गांभिर्याने विचार होणे गरजेचे आहे. अन्यथा शिक्षणाचे उपचार व्यर्थ ठरतील.

अध्ययन अकार्यक्षमता ही गूढ, गुंतागुंतीची व जटिल समस्या आहे. विविध शारीरिक व मानसिक समस्यांमुळे बालकांमध्ये ही समस्या निर्माण होते. ऑल्फ्रेड स्ट्रॉस याने घ्सायकोपॅथॉलॉजी ॲण्ड एज्युकेशन ऑफ दि ब्रेन इंजुअर्ड चाईल्डङ या पुस्तकात जन्माच्या वेळी अथवा जन्मानंतरच्या काही दिवसात जर मेंदुला इजा पोहचली तर त्याचा मुलाच्या एकंदर वागण्यावर, हलचालींवर आणि पर्यायाने शिक्षणावर परिणाम होतो. अशा वेळी अध्ययन अकार्यक्षमतेचा संबंध येतो. जर व्यक्तीला सहजासहजी अध्ययन करता येत नसेल, अध्ययनाचा वेग कमी असेल, अध्ययनातील प्राविण्याचे प्रमाण कमी असेल तर ती व्यक्ती अध्ययन अकार्यक्षम ठरते. अध्ययन अकार्यक्षमता म्हणजे शिक्षण घेतांना येणारा अडथळा असतो. अशा या अध्ययन अकार्यक्षमतेचे काही प्रकार असून त्यातील तीन मूलभूत प्रकार आहेत. तर नंतरचे दोन हे पहिल्या तीन प्रकारांचे परिणाम आहेत.



**अध्ययन अकार्यक्षमता प्रकार, समस्या व उपाय :**

अध्ययन अकार्यक्षमतेचे प्रकारानुसार समस्या व त्यावरील उपाय पुढीलप्रमाणे सूचविता येतील.

**१) वाचन विषयक (Dyslexia)** - ही अकार्यक्षमता सर्वात जास्त मुलांमध्ये आढळते. ज्यावेळी मुळाक्षरे, शब्द व त्यानुरुप आवाज योग्यपणे

समजत नाही. तसेच शब्द, वाक्प्रचार, किंवा परिच्छेदाचे योग्य आकलन होत नाही. त्यावेळी या प्रकारची अकार्यक्षमता येते. भाषा साठविणे व ती व्यक्त करणे यात येणाऱ्या अडथळयांमुळे वाचन क्षमतेवर परिणाम होत असतो.

**समस्या :** १) वाचलेले समजण्यात अडचण येते. २) आपले म्हणणे व्यक्त करता येत नाही. ३) अक्षरे, शब्द उलटे वाचतात. उदा. 'राणी' ऐवजी 'णीरा', काही अक्षरांमध्ये बदल करुन शब्द तयार करतात. उदा. 'कापड' ऐवजी पापड. ४) शब्दसंपत्ती व ओघवतेपणाचा अभाव असतो. ५) वाक्यांची रचना व्याकरणदृष्टया अयोग्य असते. योग्य शब्दांचा वापर करुन वाक्य तयार करता येत नाही. उदा. 'मी काल गावाला जाणार' 'मन उधाण वाऱ्याचे' ऐवजी

'मन उधार वाऱ्याचे' असा वाक्यांचा अपभ्रंश होतो. ६) अंक चुकीचे वाचतात, अंकांचा क्रम बदलतात अथवा गाळतात. उदा. ३१५ ऐवजी ६१५, २३ ऐवजी ३२ ७) शब्दांमधील अक्षरे गाळतात वा चुकीची अक्षरे तयार करुन शब्द उच्चारतात उदा. Deed ऐवजी Ded, Cinema ऐवजी Cimena, ८) सारखे दिसणारे शब्द व अंक चुकीचे वाचतात उदा. b ऐवजी d , m ऐवजी n. ९) शब्दांच्या अर्थाविषयी मनात गोंधळ होतो. उदा. सकाळ - संध्याकाळ, उजवा - डावा. १०) अक्षरसमूह ओळखतांना एकेक अक्षर स्वतंत्रपणे वाचणाऱ्या मुलाला भजन हे तीन अक्षरे एकत्र दिल्यावर तो भ-ज-न असे वाचतो व तशीच ओळख ठेवतो. ११) वाचनाचा वेग कमी असतो. १२) भरभर वाचु लागल्यास वाचनाचा वेग वाढेल पण अर्थ पूर्ण नसेल १३) कविता वाचन अथवा गायनात तालबध्दता नसते.

**उपाय :** १) वाचतांना होणाऱ्या चुकांचा शोध घेऊन मार्गदर्शन करावे. २) आदर्श वाचनाच्या पध्दती सांगाव्या. तसेच वाचन त्याला करुन दाखवावे. ३) अशा मुलांच्या वाचनाचे रेकॉर्डीग करुन चुका लक्षात आणून द्याव्या. ४) प्रकट वाचनास अधिकाधिक संधी द्यावी. ५) संपूर्ण पान उघडून वाचण्यापेक्षा वाचनाच्या ओळीखाली पट्टी अथवा बोट ठेवण्यास सांगून ओळ वाचायला शिकवावे. असा सराव केल्यास मुले योग्य वाचन शिकू शकतात. ६) बोललेली वाक्ये समजली आहेत काय ? हे पाहण्यासाठी छोट छोटे प्रश्न विचारावेत. ७) कविता गायनाची भरपूर संधी द्यावी. ८) एखादा प्रसंग, चित्र दाखवून किंव सहलीला नेऊन त्याचे शब्दात वर्णन करण्यास सांगावे. ९) एकसारखे दिसणारे शब्द, अंक ओळखण्यास सांगावे. उदा. दिलेल्या परिच्छेदातील य-थ, प-फ, म-भ, च-ज शोधा. दिलेल्या संख्येतील ३-६, ४-९, ७-५, शोधा. १०) वाक्य जसेच्यातसेच वाचण्यास प्रोत्साहन द्यावे, सराव करावा व आत्मविश्वास वाढवावा. ११) गाळलेली अक्षरे भरण्यास सांगून शब्द तयार करण्यास सांगावे. उदा. ख-पट. १२) मुद्यांवरुन गोष्ट सांगण्यास सांगावे. १३) समानार्थी शब्द, विरुध्दार्थी शब्द, शब्द समुहाबद्यल एक शब्द, वाक्प्रचार, म्हणींचा उपयोग, यासंदर्भात अनुभूती द्याव्या.

### २) लेखन विषयक (Dysgraphia) :

या प्रकाची अकार्यक्षमता असणारी मुले आपले विचार तोंडी चांगल्या प्रकारे व्यक्त करु शकतात. त्यांना भाषेचा प्रश्न असतो. पण लिखाणाची आखणी व मांडणी यात दोष निर्माण होतो. लेखन विषयक अकार्यक्षमतेमध्ये लेखन कार्यातील शारीरिक कृती किंवा माहितीचे संयोजन करुन ती पुर्णपणे समजून घेण्याची मानसिक कृती यांचा अभावाचा समावेश होतो.

**समस्या :** १) लेखनाचा वेग कमी असतो. २) दोन अक्षरातील, दोन शब्दातील अंतर अयोग्य असते. ३) फळयावरील मजकुर बघून-बघूनही नीटपणे व बरोबर लिहिता येत नाही. ४) लिहितांना शब्द, अक्षरे गाळणे किंवा नविन शब्द अथवा अक्षरे जोडणे, शब्दातील अक्षरांच्या क्रमातील अदलाबदल करणे. उदा. हिरवा ऐवजी हिवरा, Was ऐवजी Saw. ५) सारखे दिसणारे अंक व अक्षरे चुकीने लिहिणे. उदा. M ऐवजी N, भरभर ऐवजी मरमर.६) ऐकणे व लिहिणे यात समन्वय नसणे. उदा. उस्मानाबाद ऐकणार पण लिहिणार उमासनाबाद, जळगाव ऐकले तरी वळगाव लिहिणार. ७) लिहितांना विरामचिन्हांची दखल न घेणे. ८) पेन, पेन्सिल धरण्याची पध्दती चुकिची असते. पेन्सिलीवर जोर देऊन लिहितात. त्यामुळे सुवाच्च लेखन नसते. ९) खाडाखोड अधिक असते. १०) ऱ्हस्व, दीर्घ, काना, मात्रा, विलांटी, पहिला-दुसरा उकार, जोडाक्षरे लिहितांना चुका होतात. ११) एका रेषेत लिहिणे अवघड जाते. १२) कर्ता, कर्म, क्रियापद यातील क्रम लक्षात न घेता विचित्र वाक्य लिहितात. उदा. मी गावाला जातो. ऐवजी जातो गावाला मी. १३) अर्थपूर्ण लेखन नसते ते गोंधळात्मक, निरर्थक अथवा अनेक अर्थ निघणारे असतात.

**उपाय :** १) लेखनाचे व अक्षरांचे महत्व सांगावे २) बोटांच्या स्नायुंमध्ये योग्य ती बळकटी येईपर्यंत बॉलपेन न देता पाटीपेन्सिल अथवा कागादावरील पेन्सिलचा उपयोग करण्यास सांगावे. ३) सुरुवातील सरळ व उभ्या रेषा, अर्धगोल, पूर्णगोल, तीरप्यारेषा यांचा सराव द्यावा. ४) प्रत्येक अक्षरांचे वळण लक्षात आणून द्यावे. अक्षरे काढतांना कोठून, कशी सुरुवात करावी व कोठे, कसे थांबावे हे शिकवून सराव करावा. ५) सुरुवातीच्या काळात अक्षरे गिरविण्याचा सराव द्यावा. ६) निबंधाचे विषय देतांना मुलांना त्यांच्या आवडीचे विषय द्यावेत. त्यामुळे त्यांना लिहिण्यास प्रोत्साहन मिळेल. ७) फळयावरचे उतरवितांना चुका होतात म्हणून त्यांना पुढच्या बाकांवर बसवावे. त्यामुळे अध्ययन करतांना विद्यार्थ्यांना शिक्षकांना लिहिलेल्या भागांचे निरिक्षण सहजपणे करता येईल. ८) शुध्दलेखनासाठी अवघड शब्द प्रथम फळयावर लिहावे. नंतर ते शब्द निटपणे निरीक्षण करण्यास सांगावे व नंतर शब्द लिहिण्यास सांगावे. ९) शब्दांचा अचूक उच्चार करवून घ्यावा व त्यानंतर तसे शब्द लिहिण्याचा सराव द्यावा. १०) एखादा मजकुर तोंडी सांगावा व त्यातील विशिष्ट शब्द दिलेल्या परिच्छेदात कोणते हे सांगावे.

**३) गणित विषयक (Dyscalculia) :**

वाचन व लेखन या दोन्ही कौशल्यांच्या अडचणींचा संबंध गणिताशी येतो. मुलामध्ये मेंदुला झालेल्या सौम्य स्वरुपाच्या इजेचा परिणाम गणितातील त्रुटी निर्माण होण्यात दिसून येतो असे संशोधनात सिध्द झाले आहे. ही अकार्यक्षमता म्हणजे गणित विषयक कामातील अपुरेपणा असते.

**समस्या :** १) तोंडी उदाहरणे सोडवितांना अडचणी येणे व त्यासाठी खूप वेळ लागणे. २) गणितातील सांकेतिक चिन्हांचा वापर करतांना गोंधळ होतो. उदा. (+,x), ३) गणिते सोडवितांना विशिष्ट पायज्या लक्षात न येणे अथवा पायज्या गाळणे किंवा पायज्यांचा क्रम बदलणे ४) सूत्रांचा वापर करतांना चुका होणे. ५) संख्या व चिन्हे वाचता न येणे ६) अंक चुकीचे वाचणे. ७) क्रमबध्दतेचा अभाव उदा. १५ नंतर एकदम १७. ८) वरुन खाली, उजवीकडून डावीकडे असे दिशादर्शक अध्ययनात, आकारमान, वस्तूमान यातील तुलनात्मक अभ्यासात अडचणी येणे उदा. चैकोन व आयात यातील भेद लक्षात न येणे. ९) हातचा घेतांना गोंधळ होणे १०) पाढे लक्षात न राहणे ११) घडयाळातील अचूक वेळ सांगणे कठीण जाणे १२) मोजण्यात बोटांच्या उपयोग वरच्या वर्गापर्यंत करणे १३) योग्य व सूक्ष्म मोजमाप करता न येणे १४) बेरजेपेक्षा वजाबाकी कठीण जाणे व गुणाकारपेक्षा भागाकार कठीण जाणे १५) भूगोलातील नकाशे, आकृत्या यांच्या अर्थ न लागणे. इतिहासातील सनावळयांचा क्रम सांगता न येणे.

**उपाय :** १) गणित अध्ययनात होणाज्या चुकांचा नेमका शोध घेण्यासाठी नैदानिक कसोटया द्याव्या. चुकांचे स्वरुन समजून उपचारात्मक कार्यक्रम करावे. २) गणितातील मूलभूत क्रिया व संबोध लक्षात घेण्यासाठी मूर्ताकडून अमूर्ताकडे या अध्यापन सूत्राचा वापर करावा. ३) आधी गणित सोडविण्याचे कौशल्य हळुवारपणे शिकवावे व नंतर प्रभुत्व संपादणाचा आग्रह धरावा. ४) विविध चिन्हे यांच्या उपयोजनावर भर द्यावा. ५) पाढे पाठांतरावर भर द्यावा. ६) गणितातील मूलभूत क्रिया टप्यापटप्याने शिकवाव्यात. ७) गणितातील उत्तरांचा पडताळा घेण्याची  सवय लावावी. ८) सराव व उजळणीवर भर द्यावा.९) झालेल्या चुकांचे ताबडतोब पुनर्भरण व्हावे. झालेल्या चुका पुन्हा होणार नाहीत याची काळजी घेण्यास सांगावे.

वरील प्रमाणे मुख्य तीन प्रकारांच्या अध्ययन अकार्यक्षमतेवर लक्ष केंद्रीत करुन योग्य उपाय योग्य वेळी केल्यास प्रत्येक मुलाला शिक्षणाच्या माध्यमातून आपला विकास करात येईल.

**संदर्भ**


- चव्हाण, गणेश. (२०१२). अध्ययनार्थी आकलन व विकसन. नाशिक : इनसाईट पब्लिकेशन्स.
- घोरमोडे, के.यु. व घोरमोडे, कला (२००८). उदयोन्मुख भारतीयसमाजातील शिक्षण. नागपूर : विद्याप्रकाशन.
- पानसे, सुधीर (२०११) जागतिकीकरण आणि शिक्षण क्षेत्र. मुंबई : प्रकाश विश्वासराव लोकवाङःमय गृह.
- काळे, प्रमिला (संपादिका). (१९९७) अपवादात्मक बालकांचे मानसशास्त्र. मुंबई : मॅजेस्टिक प्रकाशन.
- काळे, प्रमिला (संपादिका). (१९९७) बालमनाविकृती-परिचय. पुणेः  नुतन प्रकाशन.
- Dash, Murlidhar (2007). Education of Exceptional Children. New Delhi: Atlantic Publishers & Distributors (p) ltd.
- Learning Disability (n.d.) en.wikipedia.org/wiki/learning disability.
- Types of Learning Disabilities. Form www.pbs.org/parents/educagtion/learning-disabilityes/types.